पुढारी



कोल्हापूर : डी. वाय. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. राकेशकुमार मुदगल यांचा सत्कार करताना कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के, प्रा. एस. एच. ठकार, प्रा. आर. जी. सोनकवडे.

# विद्यार्थ्यांनी अज्ञात गोष्टींचे नाते ज्ञात गोष्टींशी शोधावे : कुलगुरू

कोल्हापूर : माहिती व ज्ञान यात असणारा फरक विद्यार्थ्यांनी समजून घ्यावा. अज्ञात गोष्टींचा नाते ज्ञात गोष्टींशी शोधावे, असे प्रतिपादन डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. राकेशकुमार मुदगल यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील 'स्तुती' प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी ते बोलत हो. याप्रसंगी कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के, अधिष्ठाता प्रा. एस. एच. ठकार उपस्थित होते. प्रा. आर. जी. सोनकवडे यांच्या अध्यक्षतेखाली देशभर 'स्तुती' कार्यक्रम होत आहे. प्रश्नमंजुषा स्पर्धेत असीम हुसेन, शंकर हुंबे, ऋतुजा गुरव यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक मिळविले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.

तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्तुती उपक्रमाच्या समारोपप्रसंगी डी. वाय. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुदगल यांचा सत्कार करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. एस. एच. ठकार.

# अज्ञात गोष्टींचे नाते ज्ञात गोष्टींशी शोधावे

- डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुदगल यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

माहिती आणि ज्ञान यामध्ये असणारा फरक समजून घ्या आणि अज्ञात गोष्टींचे नाते ज्ञात गोष्टींमध्ये शोधा, म्हणजे तुमच्या सर्व गोष्टी सोप्या होतील, असे प्रतिपादन डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुदगल यांनी केले.

भारत सरकारचे विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित आणि शिवाजी विद्यापीठातील सैफ डीएसटी सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रशिक्षण उपक्रमाच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. विद्यापीठातील सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी फॅकल्टीच्या अधिष्ठाता डॉ. एस. एच. ठकार यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, वर्गाबाहेर आयुष्यात येणारी परिस्थितीच आपल्याला शिकवत असते. अत्याधुनिक उपकरणांवर मिळालेले शिक्षण सर्वांना त्यांच्या शोध कार्यामध्ये नक्कीच उपयोगी पडेल. सैफ सेंटरमधील उपकरणाचा वापर करून आपले समाजोपयोगी संशोधन केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवून विद्यापीठाची कार्यशाळा यशस्वी केली. तसेच सैफचे समन्वयक डॉ. सोनकवडे यांनी उत्तम नियोजन करून ही कार्यशाळा यशस्वी केली. स्तुती उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक देशभर पोहचेल, यात शंका नाही, असेही कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी फॅकल्टीच्या डीन प्रा. एस. एच. ठकार यांनी नवीन शैक्षणिक धोरणाबद्दल मार्गदर्शन केले.

डॉ. आर. जी. सोनकवडे यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील आयआयटी केंद्रीय विद्यापीठासह इतर विद्यापीठात स्तुती उपक्रम संपन्न झाला आहे. त्यापैकी शिवाजी विद्यापीठातील हा सहावा उपक्रम आहे. सहभागींनी कार्यशाळा उत्तम झाल्याचा अभिप्राय व्यक्त केला. प्रश्नमंजुषा स्पर्धेत असीम हुसेन प्रथम, शंकर हुंबे व्दितीय आणि ऋतुजा गुरव तृतीय क्रमांक पटकावला. डॉ. सोनकवडे यांनी स्तुती उपक्रमांतर्गत सात दिवस कोणते उपक्रम घेण्यात आले याचा आढावा घेतला. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.

पुढारी

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र प्रवेशासाठी २८ सप्टेंबर रोजी 'एंट्रन्स'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रवेश परीक्षा (एंट्रन्स) २८ सप्टेंबर रोजी दुपारी १२ ते १.३० या वेळेत ऑफलाईन पद्धतीने होणार आहे.

पदवीप्राप्त व पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली योजनेंतर्गत एस.सी, एस.टी, ओबीसी, ई.डब्ल्यू. एस. (नॉनक्रिमिलेयर) व अल्पसंख्याक (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध आणि जैन) व खुल्या गटातील विद्यार्थ्यांकरिता शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात २०२२-२०२३ शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश परीक्षा अर्ज ऑफलाईन, ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर यूजीसी सेंटर फॉर कोचिंग फॉर कॉम्पेटिटिव्ह एक्झामिनेशन्सवर व केंद्राच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. २१ सप्टेंबरपर्यंत प्रवेश अर्ज आवश्यक कागदपत्रासहित केंद्रांकडे पाठवून द्यावेत. केंद्राच्या कार्यालयात जमा करावेत, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

पुढारी

# विवेकानंद महाविद्यालयात प्राध्यापक प्रबोधिनीचे उद्‍घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

उद्योजक नेहमी संधी शोधत असतात. व्यवसाय स्थापित करण्यासाठी व चालविण्यासाठी ते जोखीम पत्करतात. विकसनशील शहरांमध्ये नावीन्यपूर्ण स्टार्टअपच्या विकासाचीगरजआहे. भारतातस्टार्टअप इको सिस्टिम गतिमान होत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील सामाजिक शास्त्राचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. प्राध्यापक प्रबोधिनीचे उद्‍घाटन रोपास पाणी घालून करण्यात आले. स्वागत प्रा. प्रबोधिनीचे समन्वयक प्रा. डॉ. ई. बी. आळवेकर यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. कैलास पाटील यांनी करून दिली. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. डॉ. संजय अंकुशराव यांनी आभार मानले.